**कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना** **दिनांक १८/०३/२०१९**

**टोल फ्रि क्रमांक १०६४**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२**

**पोलीस ठाणे तालुका जालना जि.जालना येथील पोलीस नाईक श्री.बाळासाहेब रामचंद्र गाडेकर यांना १,०००/- रुपयाची लाच घेतांना ॲन्टी करप्शन ब्युरो, जालना च्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | श्री.बाळासाहेब रामचंद्र गाडेकर, वय 43 वर्षे, नापोकॉ/250 नेमणुक पोलीस ठाणे तालुका जालना रा.इशान्य ग्रीन, डी मार्कचे समोर, मंठा चौफुली ता.जि.जालना मुळ गाव चिखली दाभाडी, ता.बदनापुर जि.जालना |
| २ | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि.१८.०३.२०१९ रोजी मातोश्री लॉन्स समोरील पानटपरीवर अंबडरोड जालना जि.जालना येथे. |
| ३ | लाचेची रक्कम | :- | १,०००/- रुपये |
| ४ | सापळा अधिकारी | :- | **श्री.व्हि.एल.चव्हाण,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना** |

याबाबत हकीगत अशी आहे की, यातील तक्रारदार हे मातोश्री पान सेंटर अंबडरोड जालना येथे पानटपरी चालवुन उदरनिर्वाह करतात. तक्रारदार यांचेवर सन जुलै २०१७ मध्ये विजचोरीचा गुन्हा दाखल झालेला आहे. यातिल आरोपी श्री.गाडेकर यांनी तक्रारदार यांचेकडे जाऊन तुमच्या विरुध्द विज चोरीच्या प्रकरणामध्ये वारंट आलेले असुन तुम्हाला पोलीसची गाडी बोलावुन पोलीस स्टेशनला घेऊन जावे लागेल, तुम्हाला एमसीआर होईल, तुम्हाला जेलमध्ये जावे लागेल, त्याकरता तुम्ही मला पाच ते सहा हजार रुपये दया, मी तुम्हाला कोर्टातुन वारंट रद्द करण्यासाठी दोन दिवसाचा वेळ देतो. असे सांगुन तक्रारदार यांना वारंवार फोन करुन मी तुम्हाला वारंट रद्द करण्यासाठी सवलत दिली नाहीतर दुसऱ्या वेळेस जेलमध्ये पाठविन असे म्हणुन तक्रारदार यांना वरिल कामाकरीता सवलत दिल्याबद्दल मोबादला म्हणुन २,०००/ रुपये द्यावे लागतील. त्यावेळी तक्रारदार यांनी पोलीस श्री.गाडेकर यांना नाईलाजास्तव हो म्हणाले. तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा कडे तक्रार दिली.

दि.१६.०३.२०१९ रोजी मातोश्री पानसेंटर अंबडरोड जालना येथे जावुन पोलीस श्री.गाडेकर यांची पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान पंचा समक्ष पोलीस श्री.गाडेकर यांनी तक्रारदार यांचेकडे सदर कामासाठी १,०००/- रुपयाची मागणी केली व लाचेची रक्कम स्विकारण्यास तयार झाल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन दि.१८.०३.२०१९ रोजी मातोश्री लॉन्स समोर, मातोश्री पान सेंटर अंबडरोड जालना येथे लाचेचा सापळा लावला असता पोलीस श्री.गाडेकर यांनी तक्रारदार यांना १,०००/-रुपये लाचेची मागणी पंचा समक्ष करुन लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना लाचेच्या रक्कमेहस पकडण्यात आले. पोलीस श्री.गाडेकर यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.८९७५७६२९०६ पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.**

( रविंद्र डी.निकाळजे )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना